श्री वारणा सहकारी बँक लि., वारणानगर

ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर.

सुरक्षित ठेव लॉकर धोरण-२०२५-२६ (Safe Deposit Locker Policy)

---

१) सदर धोरणाचे नांव सुरक्षित ठेव लॉकर धोरण (Safe Deposit Locker Policy) असे राहील.

२) हे धोरण बँकेचे लॉकर सुविधा घेणाऱ्या ग्राहकांकरीता लागू राहील.

३) पार्श्वभुमी-

बँकींग व्यवहारामध्ये झालेले बदल करणेत येणारा तांत्रिकतेचा वापर, ग्राहकांची सोय, येणाऱ्या तक्रारी, इंडीयन बँक्स असोसिएशन कडून आलेला अभिप्राय तसेच ना.सुप्रिम कोर्टाचा "Amitabh Dasgupta Vs United Bank of India", (judgment dated February 19, 2021 in CA No.3966 of 2010)

मधील निकाल या सर्व बाबी अवलोकनी घेवून रिझर्व्ह बँकेने त्यांचे जा.क्र.DOR.LEG.REC/40/09.07.005/2021-22 DT.18/08/2021 नुसार सर्व बँकांना Safe Deposit Locker Policy करणेबाबत आदेश दिलेले असून त्याकरीता सूचना सुध्दा सादर केलेल्या आहेत. यामध्ये प्रामुख्याने बँकेची Custodian म्हणून प्रमुख जबाबदारी विशद करणेत आलेली आहे. त्यानुसार बँकेने केलेले धोरण याचा तपशील खालीलप्रमाणे---

भाग क्र.०१- कस्टमर डयू डिलीजन्स (CDD)

अ)ज्या ग्राहकांनी/ग्राहकाने बँकेकडे रितसर अर्ज करून लॉकर सुविधा घेतली आहे व ज्यांची फ्रेबुवारी २०१६ च्या केवायसी पूर्तता परिपत्रकाप्रमाणे 'सीडीडी' पुर्तता आहे अशा ग्राहकास/ग्राहकांना लॉकर संबंधीत धोरणांची सतत पुर्तता करणेचे (On going Compliance) करणेचे अटीवर ही सुविधा देता येईल. 'सीडीडी' यामध्ये पुढील बाबींचा समावेश होईल.सुविधा मागणी करताना ग्राहकाने दिलेली माहिती व तिची सत्यता पडताळणीच्या दृष्टीने धोरणाप्रमाणे दिलेल्या कागदपत्रांची अचूक पडताळणी

ब)ज्या ग्राहकाचे/ग्राहकांचे बँकेशी इतर व्यवसायिक (बँकींग) संबंध (Banking Relationship) नाहीत त्यांना सुध्दा वरील पध्दतीने लॉकर सुविधा देता येईल. सततची पूर्तत **हा निकष सर्वच गाहकांकरीता लागू असेल.**

क)बँकेने लॉकर ॲग्रीमेंट मध्ये सदर सुविधा देताना (भाडयाने लॉकर देताना) खालील अटी नमूद करणे **आवश्यक** आहे.

१) लॉकरमध्ये बेकायदेशीर किंवा घातक स्वरूपाचा पदार्थ/वस्तु ठेवता येणार नाही.

२) बँकेस याबाबत शंका आलेस बँकेस अशा ग्राहकांबाबत **परिस्थितीनुसार** जरूरती कृती करणेचा अधिकार राहील.

३) **बँकेने** लॉकर भाडयाने घेतलेल्या ग्रहकाचा/ग्राहकांचा **सद्याचा फोटो** किंवा लॉकर उघडणेचा **अधिकार** असणाऱ्या व्यक्ति/व्यक्तींचा सद्याचा फोटो घेवून तो दप्तरी जतन करणेचा आहे (लॉकर बाबतच्या इतर रेकॉर्डसह)

भाग क्र.०२) लॉकर अलॉटमेंट (वाटप)

१) **अ)** ग्राहकाला त्यांचे पसंदीनुसार लॉकरची पूर्ण माहिती निवड करणेच्या दृष्टीने सोईची व्हावी या करीता बँकेने शाखानिहाय रिकाम्या लॉकरची यादी बँकेच्या **संगणकीय प्रणालीद्वारे** अगर अन्य **संगणकीय माध्यमातून** उपलब्ध करून दिली पाहिजे. याबाबी रिझर्व्ह बँकेच्या सायबर सिक्युरिटी फ्रेमवर्क मधील निकषांची पुर्तता होणाऱ्या असल्या पहिजेत ज्यायोगे लॉकरचे वाटपामध्ये पादर्शकता आहे त्याची खात्री होईल.

ब) बँकेने लॉकर मागणी केलेल्या ग्राहकास त्याच्या अर्जाची पोहोच देवून जर लॉकर्स उपलब्ध नसतील त्याची प्रतिक्षा सुची (Waitng List) दिली पाहिजे.

२) मॉडेल लॉकर ॲग्रीमेट : –

अ) बँकांनी **इंडियन बँक असोसिएशन** कडून तयार केला जाणारा करार स्विकारावा व सद्याच्या ग्राहकांकडून त्याप्रमाणे **दि.०१/०१/२०२३ पर्यंत तो** नुतनीकरण करून घ्यावा.

ब)सदर करार योग्य त्या स्टँप डयुटीसह साक्षांकित करून घेवून त्याची मुळ प्रत संबंधीत शाखेत व दुसरी प्रत लॉकर धारकास द्यावी ज्यायोगे त्याला या सुविधेपोटी असणारे हक्क व जबाबदाऱ्या याची माहिती होईल.

३) लॉकर भाडे : -

अ)बँकांना ३ वर्षापर्यंतचे लॉकर भाडे व प्रसंगानुसार लॉकर ब्रेक–ओपन करावा लागलेस त्यासह एकत्रित रक्कमेची ठेव पावती घेणेस परवानगी आहे मात्र सद्याच्या ग्रहकांना किंवा ज्याची खाती समाधानकारक, चालू आहेत त्याचेबाबत आग्रह धरू नये.

ब)लॉकर सुविधेच्या धोरणात वर 'अ' मध्ये नमूद कारणा व्यतिरीक्त ठेव पावतीबाबत नमूद असलेस ही बाब प्रतिबंधात्मक (Restrctive Practice) समजली जाईल.

क)लॉकर भाडे आगावू स्वरूपात जमा असेल तर लॉकर सुविधा मुदतीपूर्व बंद करताना (Surrender) प्रमाणबध्द (Proportionate) भाडे घेवून उर्वरीत रक्कम ग्राहकास परत देणेची आहे.

ड)शाखा बंद करणे, स्थलांतर करणे किंवा विलिनीकरण होणे अशा घटनावेळी शाखेकडील लॉकर्स अन्य ठिकाणी स्थलांतर करावे लागणार अशी खात्री होत असेल अशा वेळी खालीलप्रमाणे कार्यवाही करणे.

१) बँकेने दोन वर्तमान पत्रात, पैकी एक स्थानिक भाषेतील असला पहिजे, जाहीर नोटीस दिली पाहिजे.

२) संबंधीत ग्राहकांना, लॉकर्स बदलणे/बंद करणे असे पर्याय देवून २ महिने आगोदर कळविले पाहिजे.

३) जर नैसर्गिक आपत्ती अगर आपत्कालीन स्थितित बँकेस पूर्व नियोजनाशिवाय/अनियोजित शाखा स्थलांतरीत करावी लागलेस बँकेने ग्राहकाना जास्तीत जास्त लवकर कळविणेबाबत प्रयत्न केले पाहिजेत.

भाग क्र. ०३ - इन्फ्रास्ट्रक्चर व सिक्युरिटी स्टँडर्डस : -

अ) स्ट्राँग रूम/व्हॉल्टची सुरक्षा : -

१) बँकेने ज्या जागी लॉकर सुविधा देवू केलेली आहे ती घरफोडीसारख्या गुन्हगारी प्रवृत्तीस प्रतिबंध करणारी असली पाहिजे. याप्रकारे निर्माण होणाऱ्या जोखीमीचे मुल्यांकन करून दप्तरी ठेवले पाहिजे.

२) ज्या ठिकाणी लॉकर आहेत ती जागा पाऊस, पूर, यासाारख्या लॉकर खराब होणाऱ्या प्रासंगीक जोखीमेपासून सुस्थितीत असली पाहिजे.

३)आगी सारख्या घटनेची जोखीम मुल्यांकन करून ती कमीत कमी राहील याप्रमाणे खात्री केली पाहिजे.

४)बँकेने वरील जोखीमीचे निराकरण होणेचे धोरण करून त्याप्रमाणे अभियांत्रिकी अगर सुरक्षा पडताळणी नियमीत पणे करून आवश्यक उपाययोजना/दुरूस्ती केली पाहिजे.

५)लॉकरचे क्षेत्र नेहमी संरक्षीत असले पाहिजे. बँकेने आवश्यकता असलेस जोखीमीचे मुल्यांकन करून 'ॲक्सिस कंट्रोल सिस्टीम' स्थापित केली पाहिजे. ज्यायोगे अनधिकृत प्रवेश प्रतिबंधीत हाईल व लॉकर रूम मधील प्रवेशाबाबत डीजीटल स्वरूपाचे आवश्यक (Timeloges) रेकॉर्ड उपलब्ध होईल.

बँकेच्या अंतर्गत सुरक्षा पॉलिसीच्या दृष्टीने लॉकर व्यवहाराचे क्षेत्र व स्ट्राँग रूममधील प्रवेश व बाहेर गेलेली कृती सिसिटीव्ही कॅमेऱ्याच्या कक्षेत ठेवून त्याचे **१८०दिवसाचे** रेकॉर्डींग ठेवावे. ग्राहकाने त्याच्या/तिच्या परवानगी शिवाय/माहितीशिवाय लॉकर उघडला आहे किंवा चोरी किंवा सुरक्षा नियमांचे उल्लंघन झाले आहे अशा बाबी निदर्शनास आलेस बँकेने पोलीस तपासपूर्ण होईपर्यंत व मिटेपर्यंत (Settled) सिसिटीव्ही फुटेज जतन करून ठेवले पाहिजे.

५)सुरक्षा प्रणालीबाबत दस्तऐवजीकरण करून त्यादृष्टीने सबंधीत कर्मचारी यांना जरूरते प्रशिक्षण दिले पाहिजे. अंतर्गत तपसणीस त्यांनी याबाबत आढावा घेवून पूर्ततेबाबतचा अहवाल सादर केला पाहिजे. त्यायोगे सुरक्षा प्रणालीपध्दतीची अमंलबजावणी काटेकोरपणे होते याची खात्री होईल.

६)लॉकर स्टँडर्ड : -

अ)बँकांनी नवीन तंत्रप्रणाली असणारे लॉकर स्थापित करावे. याप्रमाणे कार्यवाही करताना सुरक्षिततेच्या दृष्टीने ब्युरो ऑफ इंडियन स्टँडर्ड यांनी ठरवलेले (बीआयएस) किंवा अन्य दर्जाचे मापदंड यास लागू राहतील.

ब)बँक इलेक्ट्रॉनिक पध्दतीने हाताळले जाणारे लॉकर देणार असेल तर सायबर सिक्युरिटी फ्रेमवर्कनुसार रिझर्व्ह बँकेने कळविलेले सर्व निकषांचे पालन करावे.

क)लॉकरच्या किल्यांवर बँक/शाखेचा आयडेंटीफिकेशन कोड एम्बॉस असावा जेणेकरून लॉकर्सची पडताळणी/ओळख, लॉकर्सची मालकी याची सक्षम यंत्रणेस गरजेप्रमाणे पडताळणी करता येईल.

लॉकरच्या कस्टेडीयन ने (सरंक्षकाने) नियमित व कालबध्द पध्दतीने शाखेतील लॉकरच्या किल्लया योग्य आहेत व त्याची स्थिती पडताळली पाहिजे. ग्राहकाने त्याला दिलेले लॉकर, त्यास दिलेल्या किल्लीद्वारे हाताळला पाहिजे. जर लॉकरला अतिरीक्त कुलूप/सुटे कुलुप लावणेची सुविधा असेल तर ग्राहकास याबाबत प्रतिबंधीत करता येणार नाही.

भाग क्र.०४) लॉकर ऑपरेशन्स

अ)नियमीत व्यवहार करणारे ग्राहक व त्यांचेकडून होणारे व्यवहार-

१)लॉकर धारक, त्यांनी अधिकार दिलेल्या व्यक्ति यांचे अस्तित्वाची योग्य पडताळणी/खातरजमा करून त्याबाबत रेकॉर्ड ठेवून बँकेने, लॉकर व्यवहार हाताळणेस परवानगी दिली पाहिजे.

२)बँकेने संबंधीत लॉकर हाताळणी साठी आलेल्या लॉकरधारकासह सर्व व्यक्तिंचे रेकॉर्ड ठेवले पाहिजे यात लॉकर उघडणे व बंद करणेसाठी घेतलेली वेळ व तारीख (चेक इन/आऊटसह) याचा तपशील व स्वाक्षरी घेतली पाहिजे.

व्हॉल्टरूम मध्ये प्रवेश करणे/बाहेर पडणे यासंबंधीचे लॉकर धारक/इतर व्यक्ती/बँक कर्मचारी यांच्या हालचालीबाबत रेकॉर्ड व स्वाक्षरी योग्य ठिकाणी घेतली पाहिजे.

३)बँकेचा अधिकारी ज्यास लॉकर व्यवहार हातळणेचा अधिकार आहे त्याने त्याचे जवळील पाहिली किल्ली वापरल्यानंतर अथवा पासवर्ड हातळल्यानंतर, लॉकर धारक लॉकर उघडताना जवळ हजर राहणेचे नाही. बँकेने लॉकर धारकाला जरूरती गोपनियता मिळेल (इतर ग्राहक लॉकर सुविधा घेत असताना) याबाबत खात्री केली पाहिजे.

४)बँकेने, लॉकर धारकास, दिवसाअखेरचे कामकाज (ईओडी) पूर्ण होणे पूर्वी, सकारात्मक स्वरूपाची खात्री आजमावण्यासाठी लॉकर वापराची वेळ व तारीख इमेल/एसएमएम अलर्ट (रजिस्टर्ड मेल आयडी/मोबाईलवर) दिला पाहिजे. तसेच अनधिकृतपणे लॉकर हाताळला असेल तर तक्रार निवारण पध्दती उपलब्ध असली पाहिजे.

इंटरनल कंन्ट्रोल बाय बँक्स : –

१)लॉकर धारकाने त्याला दिलेला लॉकर बँकेस परत केले नंतर Interchange of lockor ची पध्दत असली पाहिजे. उपलब्ध असणाऱ्या लॉकर्सच्या किल्लया पाकीटात बंदीस्त स्वरूपात ठेवल्या पाहिजेत.

२)डुप्लीकेट मास्टर की, अन्य शाखेत योग्य पध्दतीने ठेवली पाहिजे. मास्टर की जॉईंट कस्टडीत असलेबाबत रेकॉर्ड ठेवले पाहिजे.

३)बँकेने अचानक स्वरूपात भेट देवून रिकाम्या असणाऱ्या/परत केलेल्या लॉकर्सच्या किल्लया, त्यांची कस्टडी याबाबत कालबध्द स्वरूपात आढावा घेतला पाह्जिे. असा आढावा स्वतंत्र अधिकाऱ्याद्वारे (जो आशा व्यवहाराशी निगडीत नाही) घेतला पाहिजे अशा अधिकाऱ्याने पडताळणीबाबत रेकॉर्ड, पुरावा ठेवला पाहिजे.

४)बँकेने लॉकर रजिस्टर व लॉकर–की रजिस्टर सीबीएस संगणकीय प्रणाली माध्यमात ठेवले पाहिजे अगर अन्य संगणकीय प्रणालीत ठेवले पाहिजे. सदर यंत्रणा आरबीआय चे सायबर सिक्युरीटी निकष पूर्ण करणारी पाहिजे.

लॉकर रजिस्टर मधील नोंदी, लॉक वाटपाप्रामणे अद्ययावत पाहिजेत याबाबत ऑडीट ट्रेल उपलब्ध पाहिजे.

४)बँकेच्या कस्टेडीयन यांने लॉकर व्यवहार पूर्ण झाल्यानंतर लॉकर्स व्यवस्थित बंद केले आहेत हे तपासले पाहिजेत. लॉकर/लॉकर्स व्यवस्थित बंद केले नसतील ते तात्काळ बंद करून संबंधीत लॉकर धारकास त्वरीत रजिस्टर्ड इमेल/मोबाईलला एसएमएस द्वारे कळविले पाहिजे किंवा पत्राद्वारे कळविले पाहिजे ज्यायोगे लॉकर मधील वस्तुमध्ये काही तफावत रहात अससेल त्याची पडताळणी होईल ही बाब बँकेच्या कस्टेडीयनने रजिस्टर मध्ये नोंदवून तो बंद केलेबाबत वेळ व तारीख नमुद केली पाहिजे. बँकेच्या कस्टेडीयनने दिवसा अखेर लॉकर सबंधी स्वत: फिजीकल तपासणी करून, सर्व लॉकर्स योग्यरित्या बंद आहेत, अनावधानाने एखादी व्यक्ति लॉकर रूममध्ये बँकेच्या कामकाज वेळेनंतर अडकलेली नाही याची खात्री करणेची आहे.

भाग क्र.०५) नॉमिनेशन फॅसिलीटी अँण्ड सेटलमेंट ऑफ क्लेम्स–

अ)नॉमिनेशन फॅसिलीटी–

१) बँकेने लॉकर व सेफ कस्टडी सुविधाबाबत ग्राहकाना नॉमिनेशन सुविधा दिली पाहिजे. (बीआर ॲक्ट कलम ४५ झेडसी, झेड एफ प्रमाणे) व याबाबत जरूरते फॉर्म्स सर्व माहितीसह घेतले पाहिजेत. सदर फॉर्मवर साक्षीदाराने अंगठा लावला पाहिजे. अकौंट होल्डरची सही प्रमाणित करणेची आश्यकता नाही.

२)बँकेकडे नॉमिनेशन करणे, रद्द करणे किंवा बदल करणे याबाबतची प्रमाणित कार्यपध्दती असली पाहिजे. याबाबत रजिस्टर ही आवश्यक आहे.

३)बँकेने वरील अ.नं.२ प्रमाणे केलेल्या कार्यवाहीबाबतची पोहोच (रिसिट) ग्राहकास मागणी केली नसली तरीही दिली पाहिजे.

ब)सेटलमेंट ऑफ क्लेम्स इन केस ऑफ डेथ ऑफ कस्टमर–

१) याबाबत बँकेचे संचालक मंडळ संमत धोरण आवश्यक आहे. सदर धोरण इंडियन बँक असोसिएशन यांनी ठरविलेले मॉडेल ऑपरेटीव्ह प्रोसिजरशी सुसंगत तसेच याबाबत ज्या नियामक सुचना (Regulatory Instruction) आहेत त्याच्याशीही धोरण सुसंगत असले पाहिजे.

२) सेफ लॉकर्स/सेफ कस्टडी मधील जिन्नस/वस्तु नॉमिनीस देणेबाबत बोर्ड संमत पॉलिसी, याबाबत तक्रार झालेस त्याबाबतची पॉलिसी बँकींग रेग्युलेशन अॅक्ट कलम 452C ते 452F, सहकारी नॉमिनेशन रूल १९८५, इंडियन कॉन्ट्रॅक्ट अॅक्ट व इंडियन सक्सेशन अॅक्ट मधील आवश्यक असणाऱ्या कलमाशी सुसंगत पाहिजे.

३)सेफ कस्टडीतील आर्टीकल्स किंवा लॉकर मधील वस्तु योग्य नॉमिनिकडेच देता येतील याकरीता बँकेने, लॉकर धारकास मृत्युची पडताळणी या संदर्भात आवश्यक असणारे फॉर्म्स/पध्दती लागू असणाऱ्या कायद्याच्या कक्षेत प्रस्थापित केली पाहिजे.

४)मयत लॉकर धारकाचा क्लेम व वस्तु/जिन्नस/आर्टिकल्स यांची वारस/नॉमिनी/उत्तराधिकारी यांचेकडे सूपूर्तता क्लेम सादर तारखेनंतर १५ दिवसात झाली पाहिजे. सदर मुदत मृत्यू पुरावा, वस्तु मागणी करणाऱ्यांचे आयंडेटीफिकेशन (ओळख पटविणे) याबाबत बँकेची खात्री होणे याबाबीशी अधिन राहील.

५)बँकेने, कस्टमर सर्व्हिस कमिटीस योग्य त्या कालावधीप्रमाणे वरील क्र.०४ प्रमाणे तसेच मुदतीत पूर्तता न झालेल्या क्लेम बाबत माहिती दिली पाहिजे.

सदर कमिटी याबाबत आढावा घेवून मुदतीत क्लेम पूर्तता होईलयाप्रमाणे सुचना देईल (जर नॉमिनी संदर्भात मे.कोर्टात वाद सुरू असेल किंवा बँकेस दावेदाराची ओळख पटविणेमध्ये अडचणी निर्माण झाल्या असतील तर या बाबी वगळून)

क)अॅक्सेस टू द आर्टिकल्स इन सेफ डिपॉझिट लॉकर्स/रिटर्न ऑफ सेफ कस्टडी आर्टिकल्स–

१) जर लॉकरधारक जो एकमेव (Sole) आहे व त्याने व्यक्तिस (Individual) नॉमिनी नेमले असेल तर त्याचे मृत्युपश्चात---

अ)मृत्यू दाखला याची पडताळणी

ब)नॉमिनी व्यक्तिची ओळख, अस्सलता (जेन्यूईननेस) या बाबींची सत्यता आजमावून अशा व्यक्तिस बँकेने मयत लॉकर धारकांचे लॉकर उडणेस (Access) प्रवेश दिला पाहिजे. अशा दावेदारास विहीत नमून्यात कागदत्रांची पूर्तता करून घेवून लॉकर्स मधील वस्तु/जिन्नस हालविता येतील.

२) **जर लॉकर संयुक्त नावाचा असेल** व **संयुक्त सहीने** व्यवहाराची पध्दत/सूचना असेल व लॉकरधारकाने/धारकांनी अन्य व्यक्तिस/व्यक्तिंना वारस नेमला/नेमले असेल व संयुक्त लॉकर धारकांपैकी एकाचा मृत्यु झालेस

अ)बँकेने उत्तराधिकारी/उत्तराधिकाऱ्यांना किंवा वारसदार/वारसदारांना विहीत नमुन्यात कागदपत्रांची पूर्तता घेवून वस्तु/जिन्नस हालविणेसाठी प्रवेश दिला पाहिजे.

३)जर बँकेने ''जॉईंटली विथ सरव्हायव्हर क्लॉज'' (Jointly with Survivor Clause) अंतर्गत लॉकर भाड्याने दिला आहे व लॉकर धारकांनी लॉकर्स मध्ये प्रवेशाबाबत Either or Survivor, Any one OR Survivor किंवा Former OR Survivor किंवा बँकींग रेग्युलेशन ॲक्ट अंतर्गत Survivor बाबत लागू असणाऱ्या कलमा अंतर्गत सूचना दिली असेल तर अशा परिस्थितीत बँकेने एका/दोन्ही संयुक्त लॉकर धारकाच्या मृत्युनंतर त्याप्रमाणे आदेश (Mandate) पालन केले पाहिजे.

a) <u>Either or Survivor</u> – Either of them can operate and in case of death of lone of them the other can continue.

b)<u>Any one OR Survivor</u>—This is similar of Either or Survivor. The only difference is more than two individual can operate. In case of death of any one of the holder remaining survivor can continue.

c)<u>Former or Servivor</u>—This is the type of joint account where only former holder, the first holder can operate. Once the former account holder dies only then second holder will be able to operate.

४)बँकेने वारस/उत्तराधिकारी यांना वस्तु/जिन्नस/सामग्री देताना खालीलप्रमाणे खात्री केली पाहिजे.

अ)बँकेने लॉकर धारकाचा मृत्यू, वारस/उत्तराधिकारी यांची ओळख याबाबत योग्य ती काळजी/खबरदारी योग्य त्या कागदपत्रांससह घेतली पाहिजे.

ब)मयत व्यक्तिच्या लॉकर करीता व्यवहार करणेस परवानगी देणेपुर्वी व्यवहाराबाबत कोर्टाकडून तसेच एखाद्या मंचाकडून (Forums) ऑर्डर/प्रतिबंध करणेत आला आहे का याबाबत खात्री (Diligent Efforts) केली पाहिजे.

क)सेफ कस्टडी/लॉकर मधील सामग्री वारस/उत्तराधिकारी यांना देताना, अशी सामुग्री त्यांना मयत लॉकर धारकाच्या कायदेशीर वारसांचे विश्वस्त म्हणून देणेत येत आहे. यामुळे कायदेशीर वारसांचे हक्क/क्लेम बाधीत होत नाही हे स्पष्ट केले पाहिजे.

५)अज्ञान पालकाच्या नॉमिनीस लॉकर मधील सामुग्री हलवावयाची असेल तर अशी व्यक्ति कायद्यातील तरतुदीनुसार अज्ञान पालकाच्या वतीने व्यवहार करणेस सक्षम आहे याबाबत खात्री केली पाहिजे.

बँकेने अशा सामग्रीची दोन स्वतंत्र साक्षीदारासमोर यादी बनविली पाहिजे.(पैकी एक व्यक्ति बँक अधिकारी जो या कामाशी संबंधीत नाही व दुसरा दोवदार) जो वारस किंवा अज्ञानाच्या वतीने सामग्री घेणारा असेल)

६)बँकेने वारस (दावेदार) किंवा अज्ञानाच्या वतीने सामुग्री घेणेस सक्षम आहे यांचेकडून लॉकर/सेफ कस्टडी मधील सर्व वस्तु/सामग्री/जिन्नस मिळाले असून, लॉकर रिकामा केला आहे

व बँकेस सदर लॉकर इतर ग्राहकास देणेस हरकत नाही असे स्वतंत्र स्टेटमेंट/निवेदन घेतले पाहिजे.

७)बँकेने मयत लॉकर धारकाच्या नॉमिनी/उत्तराधिकारी यांना लॉकर / सेफ कस्टडी मधील वस्तु/सामग्री/जिन्नस देताना वारस शाबीत घेणेमध्ये विसंगती नसेल तर याबात बँकेने वरील मुद्दा क्र.४, ५ व ६ प्रमाणे कार्यवाही करावी. सक्सेशन सर्टिफीकेट, लेटर ऑफ ॲडमिनीस्ट्रेशन/प्रोबेट(शाबित करणेबाबत कोर्टाचा दाखला)/ बाँड ऑफ इंडेमनिटी/शुअरीटी हजर करणेबाबत आग्रह धरू नये.

८)जर मयत लॉकर धारकाने वारस नेमला नाही किंवा संयुक्त लॉकर धारकांनी लॉकर व्यवहाराबाबत कोणाही व्यक्तिस/व्यक्तिंना तसेच उत्तराधिकारीबाबत स्पष्ट उल्लेख केलेला नसेल तर बँकेने याबाबत बँक संचालक मंडळ धोरणाप्रमाणे कार्यवाही करणेची आहे. अशा वेळी वरील मुद्दा क्र.४,५,६ व७ प्रमाणे जरूरती खात्री करावी.

भाग क्र.०६) क्लोजर अँण्ड डीसचार्ज ऑफ लॉकर आयटमस-

१) हा भाग ग्राहकाने त्याची/तिची मूळ किल्ली किंवा पासवर्ड वापरून केलेल्या **साधारण व्यवहाराची संबंधीत नाही** तर लॉकर **ब्रेक ओपन करणेशी** संबंधीत आहे. यामध्ये खालीलप्रमाणे परिस्थिती असेल.

अ)लॉकर धारकाने किल्ली हरवीली आहे आणि स्वखर्चाने लॉकर ब्रेक करणेसाठी विनंती केली आहे.

ब)मे.कोर्ट किंवा सक्षम यंत्रणेच्या हुकूम/ऑर्डर नुसार सरकारी अंमलबजावणी यंत्रणा बँकेत दाखल होवून अशा लॉकरचे व्यवहार जप्त व त्यावर अशा यंत्रणेकडून व्यवहार करणेची विनंती केली आहे.

क)लॉकर धारक, लॉकर व्यवहारातील अटींची पुर्तता करत नाही अगर पूर्तता करणेस सहकार्य करीत नाही अशी स्थिती असलेने, लॉकर परत घेणे गरजेचे आहे असे बँकेचे दृष्टीस आले आहे.

अशा सर्व स्थितीत बँकेकडे जरूरती पॉलसी व स्टँडर्ड ऑपरेटींग प्रोसिजर (जो लागू असणारे कायदे व करारातील तरतुदी यास अधिन असणारा पाहिजे) असला पाहिजे.

२)डीसचार्ज ऑफ लॉकर कंटेटस अॅट द रिक्वेस्ट ऑफ कस्टमर ---

१)लॉकर धारकास, बँकेने दिलेली किल्ली हरविलेस त्याने याबाबत बँकेस तातडीने सूचीत केले पाहिजे. बँकेने अशा ग्राहकाकडून भविष्यात सदर लॉकरची किल्ली सापडलेस बँकेस परत दिली जाईल याबाबत लेखी हमीपत्र घेतले पाहिजे. लॉकर उघडणे, लॉकर बदलणे, किल्ली बदलून देणे या संदर्भातील सर्व खर्च संबंधीत लॉकर धारकाकडून

वसूल करून घेणेचा आहेत. अशा चार्जेस बाबत/या संदर्भात नवीन पासवर्ड दिले बाबत ग्राहकास कळविले पाहिजे.

२)असा लॉकर उघडणेची प्रक्रिया, बँकेने किंवा अधिकृत तंत्रज्ञाने, लॉकर धारकाच्या ओळखीबाबत पडताळणी करून याबाबत लॉकर ब्रेक होताना होणाऱ्या दुरूस्तीबाबत धारकाकडून अधिकृतरित्या लेखी रेकॉर्ड करून पूर्ण केली पाहिजे.

३)अ.नं.०२ प्रमाणे करावयाची कार्यवाही लॉकर धारकाच्या व बँकेच्या असा व्यवहार पहाणाऱ्या अधिकृत अधिकारी यांचे उपस्थितीत केली पाहिजे तसेच लॉकर ब्रेक ओपन/रिस्टोअरींग प्रक्रियेमध्ये संबंधीत लॉकर ब्रेक ओपन करताना, शेजारचे लॉकर्स वर त्याचा परिणाम होणार नाही व अशा ब्रेक होणाऱ्या लॉकर्स मधील सामग्री, संबंधीत लॉकर धारकखेरीज अन्य व्यक्तिस उघड होणार नाही याची दक्षता घेतली पाहिजे.

४)अटॅचमेंट अँण्ड रिकव्हरी ऑफ कंटेटस, इन अ लॉकर अँण्ड आर्टिकल्स इन द सेफ कस्टडी ऑफ बँक बाय ऐनी लॉ इन्फोर्समेंट ॲथॉरिटी---

१)सक्षम यंत्रणेने किंवा कोर्ट ऑर्डर नुसार किंवा अन्य यंत्रणा ज्यांना जप्त/वसुल करणेचे अधिकार प्रदान केलेले आहेत, अशा यंत्रणेने लॉकर किंवा सेफ कस्टडी मधील सामग्री जप्त आणि वसुलीसाठी कार्यवाही केलेस बँकेने त्यांना सहकार्य करणेचे आहे.

२)वरीलप्रमाणे कार्यवाही करताना बँकेने अशा ऑर्डर/आदेशाबाबतच्या संलग्न दस्तऐवजाबाबत पडताळणी/खातरजमा केली पाहिजे. ज्या ग्राहकांबात वरील क्र.०१ प्रमाणे कारवाई केली आहे. त्यांस पत्र/एसएमएस/ई-मेल, (बँकेकडील रजिस्टर) द्वारे झालेल्या शासकीय जप्ती/वसुलीबाबत कळविणेचे आहे.

लॉकर/सेफ कस्टडी मधील जप्त/वसुल सामग्रीची यादी अशा शासकीय यंत्रणेसमोर तयार करून त्यावर त्यांचेसह बँकेच्या दोन अधिकारी यांनी सही घेणेची आहे. अशा सामुग्रीची यादी संबंधीत ग्राहकाने बँकेच्या पत्त्यावर पाठविणेची आहे किंवा प्रत्यक्ष देवून त्यांची पोहोच घेणेची आहे.

३)वरील क्रमांक ०१ प्रमाणे कारवाई करताना (ब्रेक ओपन व सामग्री मोजदाद) कायदेशीररित्या परवानगी असेल तर बँकेने संपूर्ण घटनेचे व्हिडीओ चित्रीकरण करणेचे आहे.

५)डीसचार्ज ऑफ लॉकर कंटेटस बाय बँक डयू टू नॉन पेमेंट ऑफ लॉकर रेंट---

१)एखाद्या ग्राहकाने **सतत ३ वर्षे लॉकर भाडे** न आदा केलेस बँकेस योग्य ती पध्दत अवलंबवून असा लॉकर ब्रेक ओपन करणे किंवा असे याबाबत योग्यायोग्य ते ठरविणेचा अधिकार आहे.

२)बँकेने वरील क्र.०१ प्रमाणे कार्यवाही करताना व असा लॉकर अन्य व्यक्तिस देणेपूर्वी पुर्वीच्या लॉकर धारकास सुचीत केले पाहिजे व त्याला/तिला संबंधीत लॉकर मधील सामग्री काढून घेणेबाबत योग्य संधी दिली पाहिजे. अशा प्रकारचा **मुद्दा** लॉकर ॲग्रीमेंट मध्ये समाविष्ट असला पाहिजे.

३)लॉकर ब्रेक ओपन करणे पूर्वी बँकेने खालीलप्रमाणे कार्यवाही केली पाहिजे.

१)संबंधीत लॉकर धारकास याबाबत नोटीस किंवा रजिस्टर मोबाईलवर एसएमएस/ई–मेल केला पाहिजे.

२)जर पाठविलेले पत्र परत (Undelivered) किंवा लॉकर धारकाचा शोध लागत नाही अशी परिस्थिती असेल तर बँकेने दोन वर्तमान पत्रात (एक इंग्रजीत व दुसरे स्थानिक भाषेतील) नोटीस देवून लॉकर धारक किंवा संबंधीत व्यक्तिचा संपर्क होईल याप्रमाणे योग्य वेळ दिला पाहिजे.

३)असा लॉकर दोन स्वतंत्र साक्षीदार व बँक ऑफिसर यांचे समोर ब्रेक ओपन केला पाहिजे. जर लॉकर इलेक्ट्रॉनिक माध्यमातून उघडणार असेल तर (स्मार्ट व्हॉल्टसह) 'व्हॉल्ट ॲडमिनीस्ट्रेटर' चा पासवर्ड, शाखेतील वरीष्ठ अधिकारी यांना देवून याबाबतची संपूर्ण ऑडीट ट्रेल जतन करून ठेवणेची आहे.

४)लॉकर/सेफ कस्टडी ब्रेक ओपन करताना याबाबत तसेच त्यातील सामग्रीची मोजदाद करताना बँकेने संपूर्ण कार्यवाहीचे व्हीडीओ चित्रीकरण करून ते योग्य पध्दतीने जतन करून ठेवणेचे आहे. सदर बाबत या संदर्भात भविष्यात वाद निर्माण झालेस मे.कोर्ट/सक्षम यंत्रणा यांना पुरव्यासाठी देता येईल.

५)बँकेने वर नमुद क्र.०४ प्रमाणे कार्यवाही लॉकर रजिस्टर तसेच बँकेच्या सीबीएस प्रणालीद्वारे नोंद (Documented) अगर अन्य संगणकीय प्रणालीत नोंद करणेची आहे ही प्रक्रिया रिझर्व्ह बँकेने कळविलेल्या सायबर सिक्युरिटी फ्रेमवर्क प्रमाणे पुर्तता होणारी असली पाहिजे.

६)लॉकर ब्रेक ओपन केल्यानंतर त्यातील सामग्री, यादीसह बंदीस्त लखोटयात सील करून ठेवली पाहिजे. सदर लखोटा दावेदार मागणी करेपर्यंत आगीपासून व हाताळता येणार (Temberproof) नाही असा सुरक्षीत ठेवणेचा आहे. याबाबत रेकॉर्ड सतत पध्दतीने ठेवले पाहिजे.

७)अ.नं.०६ प्रमाणे सामग्री संबंधीतास परत करताना बँकेने ग्राहक/संबंधीतांकडून भविष्यात याबाबत वाद उत्पन्न होवू नये याकरीता सामग्रीच्या यादीवर पोहोच घेतली पाहिजे.

४)बँकेने वर अ.नं.(७) प्रमाणे कार्यवाही करताना सोबतचे फॉर्ममध्ये माहिती भरून घेणेची आहे तसेच बँकेने अ.नं.०६ प्रमाणे कार्यवाही करताना कायदेशीर कारवाईसाठी आवश्यक आहे किंवा लॉकर धारक/वासरदार सामग्री देणे आवश्यक आहे अशा परिस्थितीशिवाय बंद लखोटा/पॅकेट उघडणेचे नाही.

५)डीसचार्ज ऑफ लॉकर कंटेट इफ लॉकर रिमेंनस, इन ऑपरेटीव्ह फॉर लॉंग पिरीअड ऑफ टाईम.

(१)जर लॉकर **७ वर्षापर्यंत इन ऑपरेटीव्ह** राहीला व लॉकरधारक शोधता येत नाही, **अशा स्थितीत लॉकर भाडे नियमीत भरणा होत असले तरी बँकेला** लॉकर मधील सामग्री

नॉमिनी/कायदेशीर वारसाना देणेस किंवा पारदर्शक मार्गाने विल्हेवाट लावणेचे स्वातंत्र्य आहे. लॉकर ब्रेक ओपन करणेपूर्वी बँकेने वरील मुद्दा क्र.३(६), (७) व ४ प्रमाणे कार्यवाही करणे आवश्यक आहे. अशा आशयाचा मुद्दा **लॉकर करारात नमूद असला पाहिजे.**

२)बँकेने लॉकर ॲग्रीमेंट मध्ये लॉकर दिर्घकाळ वापरला गेला नाही तर कोणती कारवाई होवू शकते याबाबत मुद्दा नमुद करून त्याअनुषंगाने बँकेने केलेली कारवाई व सामुग्रीची विल्हेवाट ही लॉकर ॲग्रीमेंट मधील अटी व रिझर्व्ह बँकेने नेमून दिलेल्या पध्दतीनुसार केलेली असलेने बँक कारवाईबाबत सर्व जबाबदाऱ्यापासून स्वत:ला मुक्त करून घेत आहे असा आशय **असणारा मुद्दा नमुद करणेचा आहे.**

भाग क्र.०७) कॉम्पेनसेशन पॉलिसी/लायबिलीटी ऑफ बँक–

१) लॉकर व सेफ कस्टडीत ठेवलेल्या सामुग्रीची सुरक्षा/सुरक्षितता/ तसेच लॉकर व्यवहारात योग्य ती दक्षता घेणेचे बँकेचे **कर्तव्य असलेने,** निष्काळजीपणामुळे लॉकर/सेफ कस्टडीमधील सामग्रीचे नुकसान/खराब झालेस त्याच्या **जबाबदारीबाबत** बोर्ड संमत धोरण केले पाहिजे. बँकेच्या **कर्तव्यात खालील** बाबींचा समावेश राहील.

अ)लॉकर सिस्टिम योग्य पध्दतीने कार्यरत असणे.

ब)लॉकर्स,अनधिकृत प्रवेशापासून प्रतिबंधीत करणे.

क)सुरक्षिततेच्या दृष्टीने (चोरी/दरोडा) योग्य ती सुरक्षा यंत्रणा कार्यरत ठेवणे.

ड)रिझर्व्ह बँकेच्या मास्टर सर्क्युलर प्रमाणे दरोडा/डाका/चोरी/घरफोडी याबाबतच्या घटनांचे अहवाल रिझर्व्ह बँकेस मुदतीत सादर करणेचे आहेत.

२)Liability of Banks arriving from natural calamities like Earth Quake, Flood, Thunderstorm, Lighting etc. or due to Sole negligence of customer.

बँक, नैसर्गिक आपत्तीमुळे किंवा ॲक्ट ऑफ गॉड सारख्या घटनामुळे उदा–भूकंप, पूर,वीज, वादळवारा, किंवा एखादी घटना केवळ लॉकर धारकाच्या गुंणांमुळे घडली आहे अशा प्रसंगी लॉकर/सेफ कस्टडी मधील सामग्री खराब/नादुरूस्त झालेस **जबाबदार असणार नाही.** मात्र नैसर्गिक आपत्ती सारख्या घटना पासून लॉकर यंत्रणा सुरक्षित राहील, शाखा इमारत सुरक्षीत राहील याची **जरूरती दक्षता/काळजी बँकेने घेणेची आहे.**

३)लायबिलीटीज ऑफ बँक आयझिंग फ्रॉम इव्हेटस लाईक फायर, थेफ्ट, ब्रगलरी, डेकॉयटी, रॉबरी, बिल्डींग कोलॅप्स ऑर इन केस ऑफ फ्रॉड कमिटेड बाय एम्पॉईज ऑफ बँक.

१)ज्या ठिकाणी इमारतीत सेफ डीपॉझिट व्हॉल्ट बसविले आहेत त्याची सुरक्षा व सुरक्षितता राखणेची जबादारी बँकेची आहे याबाबत बँकेने सर्वोतपरी प्रयत्न सततपणे केला पाहिजे.

२)आग, चोरी, घरफोडी, दरोडा, डाका, इमारत कोसळणे अशा घटना बँकेच्या इमारतीत स्वत:च्या कमतरतेमुळे निष्काळजीपणामुळे अगर एखादी कृती केलेने/न केलेने घडणार नाही याची खात्री करणेची जबाबदारी बँकेची राहील.

बँक वरील घटनांच्या अनुषंगाने, लॉकर मधील सामग्रीच्या नुकसानीबाबत बँकेची जबाबदारी नाही असा **दावा करू शकत नाही.** बँकेच्या कर्मचाऱ्याने/कर्मचारीऱ्यांनी फसवणूक केली आहे अशा वेळी बँकेची जबाबदारी **वार्षिक भाडे रक्कमेच्या १०० पट इतकी असेल.**

भाग क्र.०८) रिस्क मॅनेजमेंट, ट्रान्सफरन्सी, अँण्ड कस्टमर गायडन्स–

१) दरोडा, आग, नैसर्गिक आपत्ती, शाखा स्थलांतर/विलिनीकरण होणे इ. बाबी मुळे लॉकर मधील सामग्री बाधीत होत असेल तर अशा प्रसंगानुरूप बँक धोरण व शाखा विमा पॉलिसी असली पाहिजे.

२)इन्शुरन्स ऑफ लॉकर कंटेंटबाय कस्टमर–

१)बँक ग्राहकाने लॉकर मध्ये ठेवलेल्या सामग्रीबाबत ग्राहकाकडून हलविल्या जाणाऱ्या सामग्रीबाबत अगर आतील वस्तु/सामग्रीबाबत रेकॉर्ड ठेवत नसलेने लॉकर मधील वस्तुच्या खात्रीबाबत कोणतीही जोखीम घेत नाही असे बँकेने लॉकर **ॲग्रीमेंटमध्ये** नमूद केले पाहिजे.

२)बँकेस लॉकर/सेफ कस्टडी मधील सामग्रीच्या विम्याबाबत प्रत्यक्ष/अप्रत्यक्ष 'ऑफर' लॉकर धारकास कोणत्याही परिस्थितीत देता येणार नाही.

३)कस्टमर गायडन्स अँण्ड पब्लीसिटी --

१)बँकेने त्यांचे संकेत स्थळावर अगर ज्याठिकाणी लॉकर सुविधा उपलब्ध आहे अशा शाखेत लॉकर ॲग्रीमेंटचा नमुना व स्टँडर्ड ऑपरेटींग प्रोसिजर सर्व अटी/शर्तीसह पहाणेसाठी उपलब्ध करून दिला पाहिजे.

२)बँकेने अशा अटी/शर्ती, व्यवहाराच्या पध्दतीबाबत ग्राहकांना अवगत केले पाहिजे.

३)बँकेने सेफ डीपॉझिट लॉकर/कस्टडी या सुविधा संदर्भातील अद्ययावत सेवा शुल्क दर संकेत स्थळावर प्रसिध्द केली पाहिजेत.

४)बँकेने त्यांचे संकेत स्थळावर लॉकर/सेफ कस्टडी संदर्भात खालील बाबी संदर्भात पॉलसी/प्रोसिजर, प्रसिध्द केला पाहिजेत.

अ)लॉकर/कस्टडी मध्ये प्रवेश पध्दत.

ब)नॉमिनी/उत्तराधिकारी नेमणेची पध्दत व अशा व्यक्तिंना सामग्री देणेची पध्दत.

क)लॉकर धारकाच्या नॉमिनी/उत्तराधिकारी/कायदेशीर वारस यांना त्यांची प्रत दिली पाहिजे.

५)बँकेने सदर परिपत्रकातील मार्गदर्शक सूचना/पध्दती या संदर्भात बोर्ड संमत धोरण लॉकर/सेफ कस्टडी संदर्भात स्टँडर्ड ऑपरेटींग प्रोसिजर निश्चित केली पाहिजे.

२)डीसचार्ज ऑफ लॉकर कंटेटस ॲट द रिक्वेस्ट ऑफ कस्टमर ---

१)लॉकर धारकास, बँकेने दिलेली किल्ली हरविलेस त्याने याबाबत बँकेस तातडीने सूचीत केले पाहिजे. बँकेने अशा ग्राहकाकडून भविष्यात सदर लॉकरची किल्ली सापडलेस बँकेस परत दिली जाईल याबाबत लेखी हमीपत्र घेतले पाहिजे. लॉकर उघडणे, लॉकर बदलणे, किल्ली बदलून देणे या संदर्भातील सर्व खर्च संबंधीत लॉकर धारकाकडून

वसूल करून घेणेचा आहेत. अशा चार्जेस बाबत/या संदर्भात नवीन पासवर्ड दिले बाबत ग्राहकास कळविले पाहिजे.

२)असा लॉकर उघडणेची प्रक्रिया, बँकेने किंवा अधिकृत तंत्रज्ञाने, लॉकर धारकाच्या ओळखीबाबत पडताळणी करून याबाबत लॉकर ब्रेक होताना होणाऱ्या दुरूस्तीबाबत धारकाकडून अधिकृतरित्या लेखी रेकॉर्ड करून पूर्ण केली पाहिजे.

३)अ.नं.०२ प्रमाणे करावयाची कार्यवाही लॉकर धारकाच्या व बँकेच्या असा व्यवहार पहाणाऱ्या अधिकृत अधिकारी यांचे उपस्थितीत केली पाहिजे तसेच लॉकर ब्रेक ओपन/रिस्टोअरींग प्रक्रियेमध्ये संबंधीत लॉकर ब्रेक ओपन करताना, शेजारचे लॉकर्स वर त्याचा परिणाम होणार नाही व अशा ब्रेक होणाऱ्या लॉकर्स मधील सामग्री, संबंधीत लॉकर धारकखेरीज अन्य व्यक्तिस उघड होणार नाही याची दक्षता घेतली पाहिजे.

सदर पॉलिसी संचालक मंडळ सभेमध्ये सन २०२५-२०२६ करीता मंजूर झाली असून नवीन सुधारीत पॉलिसी होईतोपर्यंत ही ग्राह्य धरावी.

श्री वारणा सहकारी बँक लि.,वारणानगर

(राजेश प. सार्दळ)
मुख्य कार्यकारी अधिकारी